# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

लोकमत

# राजगुरुनगर बसस्थानकावर युवकांतर्फे मतदार जनजागृती

## २० युवक-युवतींच्या पथकाने पथनाट्य केले सादर : व्ही.व्ही.पॅट मशीनबाबत महत्त्व दिले पटवून

लोकमत न्यूज नेटवर्क

**दावडी** : खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात मतदारांना जनजागृती करण्यासाठी निवडणूक निणर्य अधिकारी संजय तेली यांच्या मार्गदर्शनाखाली खेड पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी संजय नाईकरे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक, केंद्रप्रमुख यांच्या पथकाद्वारे जनजागृती केली जात आहे. या वेळी राजगुरुनगर एस.टी.बसस्थानकावर राष्ट्रीय सेवा योजनेतील मतदान जनजागृतीसाठी २० युवक-युवतींच्या पथकाने पथनाट्य सादरीकरण केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थिनी गावोगावी मतदारांपर्यंत जाऊन पथनाट्याच्या माध्यमातून मतदारांना मतदानाचे महत्त्व, तसेच व्ही.व्ही.पॅट मशीनबाबत महत्त्व पटवून जनतेत पसरलेला गैरसमज दूर केला जात आहे, तर शिक्षण विभागाच्या वतीने प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांमार्फत गावोगावी प्रचार फेऱ्या काढण्यात येत आहेत, तर विद्यार्थ्यांमार्फत घरोघरी जाऊन मतदारांकडून संकल्प पत्र भरून घेतली जाणार आहे.



राष्ट्रीय सेवा योजनेतील मतदान जनजागृतीसाठी युवक - युवतींच्या पथकाने राजगुरुनगर एस.टी.बसस्थानकावर पथनाट्य सादरी करण करुन मोहिमेचा शुभारंभ केला.

खेड तालुक्यात ४०२ शाळांमधून ३१५०० मुले-मुली हे मतदान जागृतीचे काम करत संकल्प पत्राचे शंभर टक्के काम करणार असल्याची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सुचित्रा आमले यांनी दिली. मतदान जनजागृतीसाठी तालुक्यातील संपूर्ण ४०२ शाळांतून रांगोळी, निबंध, चित्रकला, वक्तृत्व, स्पर्धेचे आयोजन करून ५ ऑक्टोबर रोजी स्वच्छता आणि मतदान जागृती केली जाणार असल्याची माहिती नायब तहसीलदार मालती धोत्रे यांनी दिली. राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात नवमतदार युवक, युवतींनी मतदान करण्याची शपथ घेतली. तर, राष्ट्रीय सेवा योजनेतील मतदान जनजागृतीसाठी २० युवक युवतींच्या पथकाने राजगुरुनगर एस.टी.बसस्थानकावर पथनाट्य सादरीकरण करून मोहिमेचा शुभारंभ केला. या वेळी नायब तहसीलदार एम.एल.धोत्रे, आगारप्रमुख रमेश हांडे, जनजागृती मोहिमेचे प्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी जीवन कोकणे, विजय दहीफळे, व्ही.व्ही.टी.प्रमुख डी.बी.उभे, गणेश मिसाळ, मंडलाधिकारी सविता घुमटकर, एन.एन.एसचे प्रमुख प्रा.मच्छींद्र मुळुक आदीसह प्रवासी, बसचालक, वाहक उपस्थित होते.

Hello Pune Gramin
Page No. 2 Oct 03, 2019
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख